# प्र क र ण पा च वे

## : स मा रो प :

# -: प्रकरण पाचवे :-

## समारोप :-

रघुवीर सामंतांच्या जीवन पटाकडे सूक्ष्मपणे पाहिल्यानंतर त्यांनी सन १९३० ते ८५ सालापर्यंतच्या प्रदीर्घ कालखंडात शब्दचित्रे, स्वभाव चित्रे, चित्रबंध, लघुकथा, लघुनिबंध, शालेय साहित्य, कोश वाड्:मय, नाटक, बालगीते, अनुवाद, बाल वाड्:मय, चित्रपट पटकथा लेखन व निर्माता, पारिजात मासिकाचे संपादन, त्याचबरोबर प्रकाशन संस्था, लॉजिंग, बोर्डींग, कोकणातील शेती अशा अनेक विध उपक्रमांचे संचालना बरोबरच त्यांच्या प्रतिमेचे वेगळे अलौकिकत्व डोळ्यात भरते.

हे सर्व लेखन वैशिष्ठयपूर्ण पध्दतीने त्यांनी लिहिलेले आहे. त्याच वेळेला फडके, खांडेकर, माडखोलकर, काणेकर, वरेरकर या सारखे प्रतिभावंत लेखक लेखन करीत होते. अशा कालखंडात आपल्या लेखानाद्वारे आपले वैशिष्टय टिकवीले. त्यांच्यानंतर येणाऱ्या पिढीतील लेखकांनी कथा-कादंबरी कारांनी नागर जीवन आणि ग्रामजीवन आपापल्या साहित्यकृतीतून चित्रित केलेले दिसते. प्रश्न असा निर्माण होतो की, ज्या रघुवीर सामंतांनी वाड्:मयातील विविध क्षेत्रात कमी - जास्त प्रमाणात आपला ठसा उमटविला त्यांच्या वाड्:मयीन क्षेत्रात साजेसा मान-सन्मान झालेला दिसत नाही.

रघुवीर सामंतांच्या कालखंडातच टिळकांच्या मृत्युनंतर महात्मा गांधीजींच्या कडे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व आले. गांधीजींनी स्वातंत्र्याचा लढा लढवीत असताना स्वदेशीवर अधिक भर दिलेला होता. या स्वराज्याच्या चळवळीत शहरा प्रमाणेच मोठया संख्येने ग्रामीण भागात रहात असलेला वर्ग त्यांना ही गांधीजींनी या लढयात सामावून घेतले.

इंग्रजांच्या विरूध्द असंतोष कृतीच्याद्वारे चालू होता आणि त्याच बरोबर सामान्य माणसांसाठी, ग्रामीण माणसांसाठी खादी, ग्रामोद्योग, सूतकताई या स्वदेशी चळवळीचे महत्व त्यांना सांगितले. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागात सभा, संमेलने, मोर्चा, धरणे सत्याग्रह व असहकार या माध्यमामुळे लोकांच्या विचारांची देवाण-घेवाण होत होती. शेकडो वर्षे मनात रुजलेल्या अनिष्ठ रूढी लोक टाकून देऊ लागले होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर घटनेने दिलेल्या सोयी सवलतींचा संपर्क महाराष्ट्रातील विविध जाती धर्मातील दलित, उपेक्षित वर्गातील लोकापर्यंत पोहोचला होता. शिक्षणाची सुविधा प्राप्त झाल्यामुळे समाजातील उपेक्षित राहिलेले घटक विविध जाती-धर्मातील लोक शिक्षित होऊ लागले. त्यांना आपल्या अस्तित्वाची जाणीव झाली. शिक्षित लोक आपल्या जीवन पध्दती विषयी जगण्याच्या पध्दती विषयी लिहू - बोलू लागले. त्यामुळे त्यांच्या मनातील व्यथा वेदना आणि भावना समजून घेणे सोपे झाले.

शास्त्रीय आणि वैज्ञानीक शोधामुळे बदलत्या कालगती बरोबर सर्व सामान्य माणूस ही बदलू लागला. नव्या वाटा-वळणांचे अवगाहन करताना अज्ञान आणि रुढीग्रस्त अशी जुन्या जीवनाची कात गळून पडू लागली. या जुन्या जोखडातून बाहेर पडलेला मनुष्य आणि त्याची ती संक्रमणावस्था, कालपरत्वे घडलेले स्थित्यंतर, परिणामी नजरेत भरणारा कायापालट यांचे दर्शन सामंतांच्या उत्तरकालीन लेखकांपुढे अनायसे राहिले.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर राजकीय सुधारणा सुरु झाल्या. ग्रामीण आणि शहरी भागातील शेती, साखर कारखाने, सूत गिरीणी, सहकारी सोसायट्या यांच्या उपलब्धतेमुळे लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारत चालली. वैज्ञानिक, शोधांचा संचार झाला. आणि त्यामुळे लोकांचे धार्मिक, कौटुंबिक, आर्थिक क्षेत्रात उलाढाल सुरु झाली. लेखकांना व्यापक जीवनपट उपलब्ध झाला.

आतापर्यंत जपलेल्या निष्ठा आणि संकल्पना गळून पडू लागल्या धार्मिक रुढी, समाजातील लग्नपध्दती, ग्रामजीवनातील, एकोपा, राजकारणाचा प्रभाव यामुळे माणसाच्या आंर्तबाहय आचरणात बदल घडून आला. राजकीय आंदोलन,सामाजिक प्रबोधन,कौटुंबिक जीवन समाज घटकातील सहजीवन हे सर्व स्वातंत्र्योत्तर काळात झपाट्याने बदलत गेले. आणि अशा बदल झालेल्या समाजातील घटक त्या त्या वेळच्या कथा कादंबरी कारांच्या पुढे आले. आणि शब्दरेखनाला आवश्यक असणारा

मालमत्ताला अनायसेच या लेखकांच्या चिंतनाचा विषय झाला. परंतु ज्या कालखंडात प्रबोधनाची पहाट होती. धूसर वातावरण होते. लेखकांच्या पुढे गतीमान जीवनाचा पट नव्हता. अशा कालखंडात शब्दचित्र रेखाटण्याचा पहिला मान रघुवीर सामंतांना मिळाला हे मराठी वाड्:मयाच्या दृष्टीने अलौकीक स्थान आहे.

व्यक्तिचित्रे, - स्वभावचित्रे लिहिण्याचे कोणतेच आराखडे तयार नसताना आपल्या भाववृत्तीने आणि चित्रवृत्तीने समोरच्या घटना प्रसंगाशी, कधी प्राण्याशी एकरूप होऊन त्याच्या मनातील खळबळ आणि खळखळ तेवढयाच रेखीव शब्दात आणि परिणामकारक पध्दतीने रघुवीर सामंतांनी आपल्या "हृदय" "तारांगण" व "मासलेवाईक प्राणी पहिले सात व दुसरे सात" या पुस्तकातून पहिल्या प्रथमच मांडलेली दिसते.

रघुवीर सामंतांनी पाहिलेल्या व्यक्ती नागर, ग्रामीण आणि विविध व्यवसाय करणा-या अशा आहेत. त्यांच्या शब्दचित्रातील व्यक्ती उच्चवर्णीय, दलित वर्गीय, कामगार वर्ग आणि स्त्रिया अशा उच्चवर्णीयां पासून तळागाळातील स्तरातील आहेत. ज्या कालखंडात उच्च वर्णीयांच्या अनुभव कक्षेत जो वर्ग नाही. तसेच दलितोध्दाराची कोणती ही चळवळ साकार झालेली नसताना आणि महात्मा फुले, आगरकरांशिवाय स्त्री हक्कासंबंधी कोणी बोलले नसताना हे दलित आणि उपेक्षित वर्ग आपल्या शब्दचित्रांचे विषय करावेत हे रघुवीर सामंतांचे द्रष्टेपण ऐतिहासीक स्वरूपाचे मानावे लागते.

पुढील भाटे माडगूळकरांपर्यंतच्या लेखकांनी विविध स्तरांतील, विविध जाती धर्मांतील ग्रामीण आणि दलित वर्गांतील अनेक व्यक्ती वरील समर्थ व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. अर्थात त्यांचा वाड्:मयीन दर्जा कमी आहे असे म्हणता येणार नाही. परंतु व्यक्तिचित्र लेखनाची वाट मळून ठेवण्याची एक क्रांतीकारक सुरुवात रघुवीर सामंतांनी पहिल्या प्रथमच केली आणि त्याच वाटेने पुढचे शब्दचित्रकार गेले असे म्हणावे लागते.

अर्थात अशी विविध क्षेत्रातील शब्दचित्रे लिहिताना विशेषत: दलित उपेक्षित वर्गातील चित्रे लिहिताना माटे-माडगूळकरांना सुध्दा प्रसिध्दी विन्मुखतेचा जाच सोसावा लागला. माट्यांचे "उपेक्षितांचे अंतरंग " प्रकाशित करण्याला प्रकाशक घाबरत होते. कारण दलित, उपेक्षित वर्ग साहित्याच्या क्षेत्रात विषय होत नाही अशी समजूत त्यांच्या काळापर्यंत होती. दलित, उपेक्षितांच्या जीवनात असे कोणते संघर्ष आहेत की जेणे करून त्यांच्या जीवनावर कथा - कादंबरी लिहावी अशी समजूत स्वातंत्र्यानंतर ही मराठी लेखकांच्या मनात रेंगाळत होती. तर रघुवीर सामंतांच्या वेळी जुन्या काळात ती किती प्रखर असेल याची कल्पना केलेली बरी. कारण कथा, कादंबरी इत्यादी सारखे वाड्:मय प्राकर मध्यमवर्गीय, पांढरपेशा जीवनाशीच निगडीत होते हे आपण मराठीतील कथा कादंब-यावरून पाहिले. तो वर्ग कथा कादंब-यांचा विषय होण्याला पुढचा काळ यावा लागला. माटे -माडगूळकरांनी जेव्हा आपली व्यक्तिचित्रे प्रसिध्द केली. तेंव्हा महाराष्ट्रीय वाचकाला अशा दलित, उपेक्षित लोकांच्या जीवनात ही जीवघेणा संघर्ष असतो याची प्रचिती आली. आणि अशी व्यक्तिचित्रे न छापणा-या प्रकाशकांनी त्या पुस्तकाच्या

आवृत्त्या काढाव्या हे लक्षात घेण्यासारखे आहे.

पुढील लेखकांना वाचक वर्ग मोठया प्रमाणात मिळाला आणि शब्दचित्रांचे कोड-कौतुक झाले. वास्तव जीवनावर आधारलेले लेखन म्हणून त्याची प्रसिध्दी झाली. परंतु सगळीकडे अंधार पसरलेला असताना एखादा मिणमिणता दिवा घेऊन त्या अंधारात वाटचाल करणारे रघुवीर सामंत हे साहित्य क्षेत्रातून अस्तंगत झाले. त्याचा ठावठिकाणा शोधण्याचा कोणत्याही समीक्षकाने किंवा साहित्यकाराने प्रयत्न केल्याचे दिसत नाही. अर्थात सामंतांची काही पुस्तके व त्यांच्या पुस्तकातील काही धडे शालेय आणि महाविद्यालयीन वर्गाला लावले होते. त्यांचे जसे कथा-कादंब-यांचे लेखन होऊ लागले तसे समीक्षकांचे त्यांच्याकडे थोडेफार लक्ष गेले. परंतु ज्या मानाने एवढी प्रचंड लेखन निर्मिती केलेल्या लेखकाला त्या लेखनाच्या मानाने साहित्य क्षेत्रात जे मानाचे स्थान मिळावयास पाहिजे होते ते दिले गेले नसल्यामुळे हा एक दैव दुर्विलासच वाटतो. पुढील ज्या शब्दचित्र लेखकांनी शब्दचित्रे लिहिली. त्यांना विषय शोधण्याचे फार प्रयास करावे लागले असतील असे वाटत नाही आणि जरी तो विषय त्यांच्या दृष्टिक्षेपात आला तरी मांडण्याची त्या विषयाची बैठक याच रघुवीर सामंतांनी घालून दिली आहे. हे विसरता येत नाही.

रघुवीर सामंतांनी आपल्या उद्योग व्यवसायाच्या निमित्ताने भेटलेल्या व्यक्तींच्या अंतर्बाह्य स्पाचे सूक्ष्म निरीक्षण केले आणि त्या निरीक्षणाचा आविष्कार शब्द प्रभुत्वाने अविष्कृत केला. हे त्यांचे

वाङ्:मयीन क्षेत्रातील अलौकीक कार्य म्हणावे लागेल. शब्दचित्रातील हा सुरुवातीचा गंगेचा ओघ पुढे मोठया पात्राच्या रूपाने विस्तीर्ण झाला. मराठीतील समर्थ लेखकांनी शेकडो शब्दचित्रे उभा केली. त्यांच्या तोंडवळा रघुवीर सामंतांच्या चित्रीकडे बघून घडविला की काय ? इतके साम्य जुन्या काळात लिहिणा-या सामंतांच्या व पुढील काळात लिहिणा-या लेखकांच्या लेखनात आढळून येते.

रघुवीर सामंतांची पन्नास एक शब्दचित्रे आणि पुढील लेखकांची शेकडो चित्रे यांची तुलना केली तर पुढील लेखकांच्या वर्णनातील आवाका मोठा दिसतो. परंतु रघुवीर सामंतांच्या शब्दचित्रांचा आवाका सूक्ष्म आणि रेखीव दिसतो. कमीतकमी शब्दात रेखीव पध्दतीने कुंचल्याच्या फटका-याने चित्र काढावे तसे रघुवीर सामंत चित्र जिवंत करतात. त्यांच्या बाहयांगाचे बारकावे, त्याच्या हालचालीतील गतीमानता त्याचबरोबर त्या व्यक्तीच्या मनातील आगडोंब मार्मिक शब्दांच्या फटका-याने रघुवीर सामंत उभा करतात. तेव्हा त्यांच्या सुयोग्य आकलन शक्तिची जाणीव होते. दुसरे असे की सुरुवातीलाच लेखन करताना ते मुंबईतील पांढरपेशे होते. श्रीमंतीचे आयुष्य जगलेले होते. आणि शिक्षकीपेशा हा पांढरपेशा वर्गातील पेशा असताना, प्रकाशन संस्था चित्रपट व्यवसाय, लॉजिंग-बोर्डींग या धंद्याशी निगडीत असताना सुध्दा त्यांचे लक्ष समाजातील मोलकरीण माळीण, घाण काढणारी भंगीण, ट्रामवाला, व्हिक्टोरियावाला, फुगेवाला, कापडविक्या यांच्याकडे जावे हे खरोखरच त्यांच्या व्यक्तिमत्वाचे दृष्टीने आगळे वेगळे आहे.

कारण लेखक ज्या विशिष्ट स्तरातून निर्माण होतो. त्या स्तरातील जीवनमूल्ये त्याला सहजा सहजी झिडकारून टाकता येत नाहीत. त्यांनी जो अनुभव घेतला तो साहित्यकृतीत उतरत असतो. परंतु काही लेखक आपल्या सामाजिक स्तरातून बाहेर येतो. अंतरमनाने समाजाचे निरीक्षण करतो. भेदक नजरेने परकाया आणि परचित प्रवेश करतो. त्यांच्या मनाचा ठाव घेतो आणि दु:खाची अनुभूती आपण स्वत: घेतली आहे, त्या अनुभूतीतून तो कलाकृती साकार करीत असतो. अशा प्रतिभा संपन्न लेखक विचारवंतांमध्ये रघुवीर सामंतांची गणना करावी लागेल असे वाटते.

## : साधन - ग्रंथ :


१] आधुनिक मराठी वाङ्:मयाचा इतिहास, खंड पहिला, अ. ना. देशपांडे , व्हीनस प्रकाशन, १९७४.

२] आधुनिक मराठी वाङ्:मयाचा इतिहास, भाग दुसरा, अ. ना. देशपांडे , व्हीनस प्रकाशन, १९७९

3) A Reader's Guide to literary terms, Karl Bekson and Arthur Ganzt, Thomes and Hadson, 1961.

४] काव्यशास्त्र, डॉ. भगीरथ मिश्रा, विश्वविद्यालय प्रकाशन १९७०

५] चरित्र आत्मचरित्र, तंत्र आणि इतिहास, प्रा. अ. म. जोशी सुविचार प्रकाशन मंडळ प्रा. लि. १९५६.

६] चरित्र आणि आत्मचरित्र [साहित्यरूप] , डॉ. सुधा कऱ्हाडे लोक वाङ्मयगृह प्रा. लि. १९७६.

७] टीका आणि टीकाकार, डॉ. वामन भार्गव पाठक, अनमोल प्रकाशन, १९७२.

८] तारांगण, रघुवीर सामंत, पारिजात प्रकाशन, १९४०.

९] प्रदक्षिणा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन १९८०

१०] प्राचीन मराठी गद्य प्रेरणा आणि परंपरा, डॉ. श्री. रं. कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९१.

११] प्राचीन मराठी वाङ्:मयाचा इतिहास, भाग एक पूर्वार्ध अ. ना. देशपांडे, व्हीनस प्रकाशन १९६६.

१३] प्राचीन मराठी गद्य, शं. गो. तुळपुळे, व्हीनस प्रकाशन, १९६१.

१४] मराठी वाङ्:मयाचा इतिहास खंड ५ वा भाग १ ला,
संपा. रा. श्री. जोग, म. सा. प., १९७३.

१५] मराठी वाङ्:मयाचा इतिहास खंड ५ वा भाग २ रा,
संपा - रा. श्री. जोग, म. सा. प. १९७३.

१६] मराठी साहित्याचे सिंहावलोकन, द. के. केळकर, मनोहर
ग्रंथमाला प्रकाशन, १९६३.

१७] मराठी वाङ्:मयाचा विवेचक इतिहास, प्रा. प्र. न. जोशी
प्रसाद प्रकाशन, १९७९.

१८] मराठी विश्वकोश खंड २ रा प्रमुख संपादक तर्कतीर्थ
श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्र राज्य, म. वि. निर्मिती
मंडळ, १९८५.

१९] मराठी सारस्वत, द्वितीय खंड, संपा- अनंत लक्ष्मण जोशी
अनमोल प्रकाशन, पहिली आवृत्ती.

२०] मासेवाहिक प्राणी पहिले सात, रघुवीर सामंत अमरज्योति
वाङ्. मय, १९४०.

२१] मासेवाहिक प्राणी दुसरे सात, रघुवीर सामंत,
अमरज्योति वाङ्. मय, १९४०.

२२] रघुवीर सामंत बेरीज आणि वजाबाकी, प्रा. वि. शं. चौघुले,
मॅजेस्टिक प्रकाशन १९९३.

२३] वाङ्. मयातील वादस्थळे, वा. ल. कुलकर्णी पॉप्युलर प्रकाशन १९६२.

२४] शास्त्रीय समीक्षेचे सिध्दांत द्वितीय भाग, डॉ. गोविंद त्रिगुणायत,

२४] एस्. चंद्र ॲण्ड कंपनी [प्रा.] लि., १९७५.

२५] हृदय, रघुवीर सामंत, भारतगौरव ग्रंथमाला प्रकाशन १९३२.